# <u>प्रेसनोट</u>

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 90/2023 दिनांक : 26.02.2023

## 1)खुनाचा प्रयत्न :—

**1)इतवारा :—** दिनांक 22.02.2023 रोजी 22.30 वा. चे सुमारास, **बाफनारोड जवळील शेर ए. दिल बार, नांदेड मध्ये,** यातील फिर्यादीस जुन्या भांडणाचे कारणावरून यातील नमुद दोन व अनोळखी तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीस खंजरने डोक्यात व पोटावर मारून गंभीर दुखापत केली व शिवीगाळ करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शेख मुजमिल शेख अब्दुल खुदुस, वय 26 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. रहेमतनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे इतवारा** गुरन 64/2023 कलम 307,504,34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मारकवाड, मो.क्रं. 8329319593** हे करीत आहेत.

**2)भाग्यनगर :—** दिनांक 23.02.2023 रोजी 21.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे राहते घरी खंडोबा चौक शिवरोड तरोडा नाका, नांदेड मध्ये,** यातील फिर्यादीस तीचे सासरचे लोक यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून सॅनेटरी दुकान टाकण्यासाठी माहेरहुन दहा लाख रूपये घेवून ये म्हणुन तीचा शारीरीक व मानसिक छळ करून मारहाण केली. फिर्यादीचे नातलग मोठा व छोटा भाऊ तसेच भावाचे सासरे भेटण्यासाठी आले असता फिर्यादीस सासरचे लोकांनी तुझ्या माहेरचे लोकांना तु का बोलावले म्हणुन फिर्यादीचे अंगावर पेट्रोल ओतले व तुला आग लावून खतम करतो तुझे भाऊ काय करतात ते बघुन घेतो असे म्हणुन आरोपी काडीपेटी आणण्यासाठी किचन मध्ये पळाला त्यावेळी फिर्यादीचे भाऊ सोडवण्यास गेला असता त्याचे डोक्यात लोखंडी रॉडने मारून जखमी केले. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरन 77/2023 कलम 307,324,498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री भिंसे, मो.क्रं. 9822987573** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :—

**वजिराबाद :—**दिनांक 24.02.2023 रोजी 20.00 वा. चे सुमारास, **हिंगोली गेट पुलाखाली, नांदेड येथे,** फिर्यादी हा त्याचे गावाकडे जाण्यासाठी शिराढोण बसची वाट पाहत थांबला असता अनोळखी तीन इसमांनी जिवे मारण्याची धमकी देवून सॅमसंग कंपनीचा मोबाईल किंमती 10,000/— रूपयाचा व खिशातील नगदी 500/— रूपये असा एकुण 10,500/—रूपयाचा ऐवज जबरीने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी ऋषिकेश हरी सुक्रे, वय 16 वर्षे, व्यवसाय शिक्षण रा. तेलंगवाडी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 61/2023 कलम 392,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री मुत्येपोड, मो.क्रं. 9130085833** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**नांदेड ग्रामीण :—** दिनांक 25.02.2023 रोजी 07.00 वा. ते 15.00 वा. चे दरम्यान, **अनिता कॉलनी मेन रोड धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फियादी यांची पत्नी शाळेत व मुलं कॉलेजला तसेच फिर्यादी हे ड्रायव्हिंग स्कुलला शिकवण्यासाठी गेले असता फिर्यादीचे घराचे कंपाउंडच्या गेटवरून चढुन घरात आत मध्ये प्रवेश करून बेडरूमधील लोखंडी कपाट फोडुन आत लॉकरमधील ठेवलेले सोन्याचे, चांदीचे दागीने, असा किंमती 56,500/— रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी आनंद पुंडलिकराव खानापुरकर, वय 46 वर्षे, व्यवसाय ड्रायव्हिंग स्कुल रा. अनिता कॉलनी मेन रोड धनेगाव ता. जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 120/2023 कलम 454,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2121 पांचाळ, मो.क्रं. 9011079556** हे करीत आहेत.

## 4)चोरी :—

**1)लोहा :—** दिनांक 24.02.2023 रोजी 04.40 वा. चे सुमारास, **लोहा ते नांदेड रोडवरील जनाई धाबा लोहा ते लातुर फाटा नांदेड येथे,** यातील फिर्यादीचा 12 टायरी ट्रक क्रमाक के.एल./48—एच—3546 मधील सुपारी 19 पोते 1 टन 2 क्विंटल 35 किलो किंमत अंदाजे 3,40,,000/—रूपयाची माल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेला. वगैरे **फिर्यादी अभिनेश अप्पू कुट्टन, वय 26 वर्षे, व्यवसाय ट्रक चालक रा. थोरापल्ली गुडलूर जि. निलगिरी थोरापल्ली राज्य तमिळनाडु** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लोहा** गुरनं 40/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2483 साखरे, मो.क्र. 9830015453** हे करीत आहेत.

**2)बिलोली :—** दिनांक 24.02.2023 रोजी 23.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतातून अरळी, ता. बिलोली जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे शेतातील यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीचे शेतातील 20 फुटी जैन कंपनीचे पाईप किंमती 15,000/—रूपयाचे चोरून नेले. वगैरे **फिर्यादी विश्वंभर शंकरराव बोडके, वय 51 वर्षे, व्यवसाय शेती रा. अरळी ता. बिलोली जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे बिलोली** गुरनं 23/2022 कलम 379,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1985, मो.क्र. 7721005064** हे करीत आहेत.

## 5)अवैध रेती चोरी :—

**हिमायतनगर :—**दिनांक 16.02.2023 रोजी 02.30 वा. चे सुमारास, **रेल्वे गेट जवळ हिमायतनगर ता. हिमायतनगर जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिरीत्या लिलाव न झालेली नदीपात्रातुन रेती उपसा करून तिची टॅक्टर क्रं एमएच–26/बीई–0557 चे सहयाने रेतीची चोरटी विक्री करण्याच्या उद्द्शाने वाहतुक करीत असतांना मिळुन आला. वगैरे **फिर्यादी दिलीप परसराम राठोड वय 57 वर्षे व्यवसाय नौकरी मंडळअधिकारी हिमायतनगर तहसील कार्यालय जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हिमायतनगर** गुरनं 44/2023 कलम 379, भादवी, आणि खनिज अधिनियम आणि विकास अधिनीयम 1957 कलम 4, 21 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/श्री सिंगनवाड, मो. क्र. 9049078521** हे करीत आहेत.

## 6)विवाहीतेचा छळ :—

**हदगाव :—** दिनांक 25.12.2022 रोजी 20.00 वा. पासुन ते आज पावेतो, **फिर्यादीचे घरी मौजे गोरलेगाव ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने फिर्यादी बाईस मारहाण व शिवीगाळ करून शारिरीक व माणसीक छळ केला व चारित्र्यावर संशय घेवून जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 35 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे हदगाव** गुरनं 34/2023 कलम 498(अ),323,504,506 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2817 मुंडिक, मो.क्रं. 7774032817** हे करीत आहेत.

## 7)शासकीय कामात अडथळा :—

**भाग्यनगर :—** दिनांक 25.02.2023 रोजी 00.30 वा. सुमारास, **स्नेहनगर पोलीस कॉलनी, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने तुम्ही माझी विद्युत लाईट का कट केली या कारणावरून व तुम्ही मला नेहमीच त्रास का देता असे म्हणुन फिर्यादीची गच्ची धरून घरात आढले व फिर्यादी सरकारी काम करीत असतांना सरकारी कामात अडथळा निर्माण केला व फिर्यादीशी झटापट करून शिवीगाळ केली व तोंडावर बुक्कीने मारून फिर्यादीचे खालचे समोरील दोन दात पाडले तसेच नाकावर चावा घेवुन गंभीर जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली व विद्युत चोरी केली. वगैरे **फिर्यादी** श्रीकांत बळीराम सोनटक्के, **वय 57 वर्षे व्यवसाय नौकरी सहा. अभियंता रा. मंत्रीनगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 78/2023 कलम 353,332,333,504,506 भादवी सह कलम 135 भारतीय विद्युत कायदा 2003 प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री पाटील, मो.क्रं. 8149873591** हे करीत आहेत.

## 8)भारतीय हत्यार कायदा :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 24.02.2023 रोजी 22.35 वा. चे सुमारास, **पावडेवाडी ते विश्रामगृह समोर, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने त्याची होंडा युनीकॉर्न मो.सा. क्रंमाक एम.एच./26–ए.पी.–4727 वर बिना परवाना बेकादेशीररीत्या एक लोखंडी खंजर आपले ताब्यात बाळगलेला मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री मिलींद मधुकरराव सोनकांबळे, ने. पोस्टे शिवाजीनगर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 58/2023 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/81 बंडेवार, मो.क्रं. 9923103778** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड